Pune Police

# पोलीस असल्याचे सांगून अटक करण्याची धमकी देवून ४० लाखांची खंडणी मागणारे प्रियकर व प्रेयसीस अटक

फिर्यादी इम्रान उस्मान शेख, रा. मार्केटयार्ड यांना दि. २८/०१/२०१७ पासून ते दि. ०१/०२/२०१७ पर्यंत अनोळखी मोबाईल फोनवरुन धमकीचे फोन आले व आम्ही पोलीस असून तू व तूझी बायको बेकायदेशीर कासव खरेदी-विक्री डील करता हे आम्हास माहित झाले आहे, तू ४० लाख रुपये दे नाही तर तुला व तूझ्या पत्नीस अटक करु अशी फोनद्वारे धमकी दिली व पैसे दिले नाही तर तुझ्या मुलीस पळवून नेवू. फिर्यादीस शेवटचा आलेला कॉल हा त्याच्या घरी काम करणारी मोलकरणीच्या मुलीच्या नंबरवरुन आला होता. त्याप्रमाणे फिर्यादीने मार्केटयार्ड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २२/२०१७, भादंवि क. ३८५,३८७,५०७,१७० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. दाखल गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना फिर्यादीच्या घरी काम करीत असलेल्या मोलकरणीची मुलगी दि. ०१/०२/२०१७ रोजी पासून गायब असल्याचे लक्षात आले व तिचा मोबाईलही बंद होता.

सदरहू मुलीचा शोध घेता, ती गंगाधाम चौकात मिळून आली. तेव्हा तिने आपणास कॉलेजवरुन घरी येताना दोन जणांनी व्हॅनमध्ये येवून मला उचलून नेले व एका रुममध्ये बंद करुन ठेवले होते. नंतर संध्याकाळी त्यांनी मला खडी मशीन चौकात नेवून व्हॅनमधून ढकलून दिले, असा बनाव तयार करुन सांगितला.

आरोपीत मुलीला विश्वासात घेवून तपास केला असता तिने आपण आपला प्रियकर मतीन शेख असे दोघांनी लग्न ठरवून त्यास मोबाईल दुकानासाठी पैशाची गरज होती म्हणून आईच्या नावे एफ.डी. मध्ये असलेले ६० हजार रुपये मतीनला दिले होते. अलीकडे आई पैसे परत दया नाहीतर लग्न होवू देणार नाही अशी सांगत होती. म्हणून आम्ही ऑगस्ट-२०१६ मध्ये रजिस्टर लग्न केले व आईचे पैसे परत देण्यासाठी आम्ही सिरियल पाहून प्लॅन केला. त्या प्लॅन प्रमाणे फिर्यादीची मुलगी पळवून नेण्यासाठी प्लॅन करुन तसे धमकीचे फोन केले व फोन करण्यासाठी दुरुस्तीला आलेले मोबाईल हॅन्डसेट व सिमकार्डचा उपयोग केला आहे. पकडले जावू नये वरील प्रमाणे बनाव केला होता.

वरील कामगिरी गुन्हे शाखेचे श्री. दिपक साकोरे, अति. कार्यभार अपर पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. पी.आर. पाटील, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. भोसले सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सिताराम मोरे, सपोनि श्री. रविंद्र बाबर, पोउनि श्री. प्रकाश अवघडे, सपोफौ अशोक भोसले, अनिल घाडगे, रंगम, रासगे, अतुल साठे, संदिप राठोड, सुजित पवार यांनी केली आहे.

